| MHAH070004632025 | सत्र खटला क्र.१७/२०२५ आदेश नि.५४<br>७. आकाश ठकाराम दंडवते वि.महा. सरकार |
|---|---|

१. ८०,०००/- रुपयांच्या ऐपतदार जामीनदारा ऐवजी ४०,०००/- रुपयांचे दोन जामीनदार देण्यास परवानगीसाठी आरोपी क्र.७ ने निशाणी ५४ चा अर्ज केला आहे. दि.१२.०८.२०२५ रोजी अर्जदार/आरोपी क्र.७ चा ८०,०००/- रुपयांचा जामीन देणेच्या अटीवर अर्ज मंजूर केला. परंतु अर्जदार/आरोपी हा ११ महिन्यांपेक्षा जास्त काळ तुरुंगात आहे. त्याच्यामागे त्याच्या कुटुंबात फक्त पत्नी व एक लहान मुल आहे. त्यामुळे त्याला व त्याच्या कुटुंबाला ८०,०००/- रुपयांच्या ऐपतदार जामीनाची व्यवस्था करणे शक्य नाही.

२. सुविद्य अतिरीक्त सरकारी अभियोक्ता श्री.एस.ए.वाकचौरे यांनी अर्जावरच म्हणणे दिले की, अर्जदार/आरोपीने दि.२३.०७.२०२५ रोजी नि.१९ ला जामीन मिळणेकामी अर्ज दिला. त्यामध्ये अनु.क्र.२१ मध्ये न्यायालय ज्या अटी व शर्ती जामीन देतांना आरोपीला घालीन त्याचे पालन आरोपी क्र.७ करेल असे त्याने मान्य केले आहे. त्यावरुन न्यायालयाने दि.१२.०८.२०२५ रोजी अर्जदार/आरोपीस ८०,०००/– रुपयाचा वैयक्तिक जात मुचलका व ऐपतदार जामीनदार स्वीकारुन जामीनावर मुक्त करावे असा आदेश केला आहे. त्यामुळे अर्जदार/आरोपीस सदर अर्ज देवून आदेशातील अट शिथील करता येणार नाही. त्यामुळे सदर अर्जावर त्यांनी सक्त हरकत घेतली आहे.

३. दोन्ही बाजूंचे सुविद्य वकीलांचा युक्तीवाद ऐकला.

४. विवाद्य कथने, युक्तीवाद व दाखल कागदपत्रे यांचा साकल्याने विचार केला. अर्जदार/आरोपी क्र.७ चा जामीन अर्ज नि.१९ दि.१२.०८.२०२५ चे आदेशाने मंजूर केला होता. रक्कम रु.८०,०००/– चा ऐपतदार जामीनदार स्वीकारुन त्यास जामीनावर मुक्त करण्याचा आदेश केला होता. सदर आदेश होवून दोन महिन्यांचा कालावधी उलटून सुद्धा अर्जदार/आरोपी क्र.७ जामीन देवू

शकला नाही, ही बाब असे दर्शवते की त्याचे कुटुंबीय/नातेवाईक यांना ऐपतदार जामीन मिळवणे दुरापास्त झाले आहे. त्यामुळे रक्कम रु.८०,०००/– च्या एक ऐपतदार जामीनदाराऐवजी दोन जामीनदार देण्याची परवानगी अर्जदार/आरोपी क्र.७ ला देणे न्यायोचित ठरेल.

**आदेश**

अ. अर्ज नि.क्र. ५४ मान्य केला आहे.

ब. रक्कम रु.८०,०००/– च्या एक ऐपतदार जामीनदाराऐवजी दोन जामीनदार देण्याची परवानगी अर्जदार/आरोपी क्र.७ ला दिली आहे.

MANDAR RAMCHANDRA NERLEKAR

Digitally signed by MANDAR RAMCHANDRA NERLEKAR
Date: 2025.10.14 16:47:34 +0530

संगमनेर ( मंदार नेरलेकर )

दिनांक –१४/१०/२०२५. अतिरिक्त सत्र न्यायाधीश, संगमनेर.